**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष १ ले ●अंक ३५६ वा ● शुक्रवार १७ मे २०२४ ● पाने ४ ●किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 356 | Date : 17/05/2024 blow Friday Page 4 Price 4

## ४ जूनला नरेंद्र मोदींची पाठवणी होणार; खर्गे यांचा दावा



**लैखनौ/दैनिक यशसिध्दि न्यूज**

कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी, लोकसभा निवडणुकीच्या चार टप्प्यांनंतर इंडिया आघाडी मजबूत स्थितीत आहे. जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींना निरोप देण्याचा निर्णय घेतला आहे, असे म्हणत केंद्र सरकारवर निशाणा साधला. इंडिया आघाडी ४ जून रोजी नवीन सरकार स्थापन करणार आहे. उत्तर प्रदेशच्या राजधानीत म्हणजे लखनौमध्ये समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत खर्गे यांनी हा दावा केला. इंडिया आघाडी सरकार स्थापन करण्याचा दावा करताना खर्गे यांनी, निवडणुकीचे चार टप्पे पूर्ण झाले आहेत. इंडिया आघाडी मजबूत स्थितीत आहे. जनतेने पंतप्रधान मोदींना निरोप देण्याचा निर्णय **। पान २ वर**

# ईडीने जप्त केलेला पैसाबाबत पंतप्रधान मोदींचं मोठं विधान

**नवी दिल्ली /दैनिक यशसिध्दि न्यूज**

भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये अंमलबजावणी संचालनालयाने जप्त केलेले पैसे देशातील गरिबांना परत करण्यासाठी केंद्र सरकारद्वारे पर्याय शोधले जात आहेत, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. तसेच यासंदर्भात कायदेतज्ज्ञांशी चर्चा सुरू असल्याचेही ते म्हणाले. इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.



भ्रष्टाचाराच्या प्रकरणांत जप्त करण्यात आलेले पैसे गरीबांना कसे देता येईल, यासंदर्भात मी खूप विचार करतो आहे. मला मनापासून वाटते, की हा पैसा गरीबांना परत मिळावा, कारण हा पैसा भ्रष्टाचाऱ्यांनी गरिबांजवळून लुटला आहे. यासाठी केंद्र सरकार विविध पर्याय शोधत आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. तसेच मला यासाठी कायद्यात बदल करावे लागले तर मी ते करेन. याबाबतीत मी कायदेतज्ज्ञांशी चर्चा करतो आहे, असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना, भारतीय दंड संहितेच्या जागी आणण्यात आलेल्या न्याय संहितेत यासंदर्भात काही तरतुदी आहेत, असेही त्यांनी सांगितले. तसेच तपास यंत्रणांनी आतापर्यंत १.२५ लाख कोटी रुपये जप्त केले आहेत , अशी माहितीही त्यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी मोदी सरकार ईडीचा गैरवापर करत असल्याच्या विरोधकांच्या आरोपाही प्रत्युत्तर दिलं. ईडी ही तपास संस्था आम्ही निर्माण केलेली नाही. कॉंग्रेसच्या काळातही ही संस्था अस्थित्वात होती. मात्र, त्यावेळी ती त्यांच्या कार्यक्षमतेनुसार कार्य करू शकत नव्हती. आज ईडी त्यांच्या पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करत आहे. त्यांना त्यांचं काम करू द्यायला हवं, असे ते म्हणाले.

## ४ जून देशात डी–मोदीनेशन होणार; उध्दव ठाकरे यांची टिका



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

उद्धव ठाकरेंनी आज लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी डोंबिवलीत प्रचारसभा घेतली. या सभेत त्यांनी भरपावसात भाषण केलं. तसंच देशात डिमॉनिटायझेशन ज्या प्रमाणे झालं होतं तसं ४ जूननंतर डी–मोदीनेशन होणार आहे. नरेंद्र मोदी देशात असतील पण ते पंतप्रधान नसतील असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. त्यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर जोरदार टीका केली आहे.

२०१६ मध्ये मोदींनी काय केलं होतं? चलनी नोटांचं डिमॉनिटायझेशन केलं. तसंच आज मी तुम्हाला सांगतो ४ जूनपासून तुम्ही फक्त नरेंद्र मोदी असाल , पण देशाचे पंतप्रधान असणार नाही. मी आता नवीन शब्द दिला आहे. ४ जून रोजी देश डीमोदीशन करणार आहे. मला प्रश्न विचारला जातो आहे की मोदींनी २५ सभा घेतल्या. मी म्हटलं घ्या आणखी सभा घ्या. कारण पंतप्रधान म्हणून तुमच्या या शेवटच्या सभा आहेत. भाजपाच्या भविष्याची मला चिंता वाटते आहे कारण ४ जूनला यांची सत्ता जाणार. भाजपाचं काय होणार माहीत नाही. पण मोदींना मी विचारु इच्छितो तुम्ही म्हणताय की ७५ वर्षे झाली की राजकारण्यांनी निवृत्त झालं पाहिजे. मग आता तुम्ही काय करणार? दोन वर्षांनी तुम्ही ७५ वर्षांचे होत आहात. तेव्हा भाजपाचं काय होणार? सगळे धोंडे भाजपाच्या पदरात टाकले आहेत.

मी आज डोंबिवलीकरांशी बोलायला आलो आहे. मोदींची भाषा तुम्हाला मान्य आहे का? मला नकली संतान म्हणत आहेत हे तुम्हाला मान्य आहे का? राजकारणात जेव्हा शिवसेना आणि भाजपा अस्पृश्य होते त्यावेळी आम्ही तुम्हाला साथ दिली. आज त्याच शिवसेनेला नकली म्हटलं जातं आहे हे पटतं आहे का? मला भाजपाचे अनेक **। पान २ वर**



## नरेंद्र मोदींना पुन्हा प्रधानमंत्री बनविण्यासाठी मुंबईच्या सर्व जागा महायुती जिंकणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले


**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नरेंद्र मोदी हे विकासपुरुष ठरले आहेत.जगात सर्वाधिक लोकप्रिय नेते ठरले आहेत.त्यांना देशाला वेगवान विकासाच्या मार्गावर भरधाव पुढे नेले आहे.त्यामुळे नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा प्रधानमंत्री बनविण्यासाठी मुंबईतील लोकसभेच्या सर्व सहा जागांवर महायुती च्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.वरळी बिडीडी चाळ येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित दक्षिण मुंबई मतदार संघाच्या महायुती च्या लोकप्रिय उमेदवार सौ.यामिनीताई जाधव यांच्या प्रचारासाठी आयोजित रिपाइं कार्यकर्त्यांच्या संमेलनात ना. रामदास आठवले बोलत होते. दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघाच्या महायुती च्या उमेदवार यामिनीताई जाधव या लढाऊ उमेदवार आहेत.यामिनी या रणरागिणी आहेत.बौद्ध आंबेडकरी जनतेच्या त्या भिमकन्या आहेत.त्यांना गरीब बहुजनांचे झोपडपट्टी वासियांचे प्रश्न त्या जाणतात.दक्षिण मुंबई मध्ये विकासाची कामे करून दक्षिण मुंबईला सोन्याची मुंबई करण्या साठी यामिनी ताई जाधव यांना निवडून दिले पाहिजे. त्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी घरघरात जाऊन महायुतीचा प्रचार करावा असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.

## घाटकोपर दुर्घटनेतील आरोपी भावेश भिंडेला अटक; उदयपूरमधून पोलिसांनी घेतले ताब्यात

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

घाटकोपर दुर्घटनेतील आरोपी भावेश भिंडेला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याला उदयपूरमधून ताब्यात घेण्यात आलं असून लवकरच मुंबई आणण्यात येणार असल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली आहे.



मुंबईत १३ मे अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे घाटकोपरच्या पूर्व द्रुतगती मार्गावर लावलेले होर्डिंग कोसळले होते. या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला होता. हे होर्डिंग ज्या इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने लावले होते, भावेश भिंडे हा त्या कंपनीचा संचालक असल्याने त्याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही दुर्घटना घडल्यानंतर पोलिसांकडून भावेश भिंडेचा शोध घेतला जात होता. पोलिसांनी त्याच्या मुलुंड येथील घरी जाऊन त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यावेळी तो घरी आढळून आला नाही. ज्यावेळी पोलिसांनी त्याचे शेवटचे लोकेशन शोधले, त्यावेळी त्यांना त्याचे शेवटचे लोकेशन लोणावळ्यात असल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांचे एक पथक भावेश भिंडेचा शोध घेण्यासाठी लोणावळ्यात दाखल झाले होते. मात्र, त्याला पकडण्यात पोलिसांना यश आलं नव्हते. दरम्यान मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने आज सायंकाळी त्याला राजस्थानच्या उदयपूरमधून अटक केली आहे. लवकर त्यांना मुंबईत आणण्यात येणार असल्याचे मुंबई पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे.

**। पान २ वर**

# शासकीय यंत्रणेला पूर्व सूचना दिल्याशिवाय अशासकीय संस्थांनी कामे सुरू करू नयेत : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान....

**या अभियानांतर्गत जिल्ह्यात पूर्ण झालेल्या ८१ कामांमधून ४१ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात येऊन ०.१४८ टीएमसी पाणी साठवण क्षमता निर्माण झाली तर याचा लाभ सोळाशे शेतकऱ्यांना झाला.**

**सोलापूर/प्रतिनिधीः**

जिल्ह्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत. या अंतर्गत जिल्ह्यातील २५२ कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अशासकीय संस्थाकडून कामे सुरू आहेत, परंतु काही अशासकीय संस्था संबंधित शासकीय यंत्रणेला कोणतीही पूर्वसूचना न देता कामे सुरू करत आहेत. ही बाब अत्यंत चुकीची असून अशासकीय संस्थांनी या पुढील कामे कोणतीही पूर्व सूचना न देता सुरू करू नयेत अन्यथा अशा संस्थांना काळ्या यादीत टाकले जाईल याची नोंद घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियान आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, प्रांताधिकरी विठ्ठल उदमले, प्रांताधिकारी सदाशिव पडदूने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, वरिष्ठ भू वैज्ञानिक श्री. शेख यांच्यासह सर्व समिती सदस्य व अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की अशासकीय संस्थांना गाळमुक्त धरण अंतर्गत कामे करत असताना शासकीय यंत्रणांकडून सहकार्य करण्यात येत आहे. त्याच पद्धतीने अशासकीय संस्थांनी ही शासनाने घालून दिलेल्या विहित अटी व शर्तींनुसार कामे केली पाहिजे. अशासकीय संस्थांच्या ज्या काही अडचणी येथे मांडण्यात आलेल्या आहेत त्या नक्कीच सोडवण्यात येतील, परंतु या संस्थांनी गाळ काढण्याचे कोणतेही काम सुरू करत



असताना संबंधित शासकीय यंत्रणेला पूर्वकल्पना द्यावी. तसेच काम पूर्ण झाल्यानंतरही त्याविषयी सविस्तर माहिती द्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

अशासकीय संस्थांनी गाळ काढत असताना तो गाळ कोणत्या शेतकऱ्यांच्या शेतावर टाकला जात आहे त्या संबंधित शेतकऱ्यांच्या नावांची यादी तयार करावी. संबंधित शासकीय यंत्रणा कामावर भेट व पाहण्यासाठी आल्यावर त्या शेतकऱ्यांची यादी यंत्रणेला उपलब्ध करून द्यावी. त्याप्रमाणेच जलसंधारण विभागाने या सर्व कामांची माहिती रोजच्या रोज अद्यावत करण्यासाठी अवनी प उपलब्ध करून दिलेले आहे. त्यावर संपूर्ण अद्यावत माहिती व्यवस्थितपणे भरावी. ही माहिती भरत असताना काही अडचण येत असतील तर त्या अनुषंगाने सर्व शासकीय संस्थांच्या तांत्रिक व्यक्तींचे प्रशिक्षण लवकरच आयोजित करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील २५२ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती त्यातील ८१ कामे पूर्ण झालेली आहेत. **। पान २ वर**

## संपादकीय

### रुग्णांचे बळी रोखता येतील.

हजारो नागरिकांना बाधा आणि शेकडोंच्या संख्येने होणारे रुग्णांचे मृत्यू, अशा कोरोनाच्या गंभीर महामारीनंतरही आपल्याकडील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासारख्या अतिमहत्त्वाच्या विषयावर शासनकर्ते गंभीर का नाहीत, असा प्रश्न अनेकांना पडल्याशिवाय राहात नाही. कारण, शासकीय रुग्णालयांत वारंवार होणाऱ्या रुग्णांचे मृत्यू होण्याचे प्रकार काही केल्या थांबत नाहीत. भांडुप येथील मुंबई महानगरपालिकेच्या सुषमा स्वराज प्रसूतिगृहात अन्सारी कुटुंबातील सैदुननिसार अन्सारी या गर्भवती महिलेवर वीजपुरवठा खंडित झाल्याने तसेच जनरेटरही बंद अवस्थेत असल्याने चक्क टॉर्चच्या उजेडात प्रसूती करण्याची वेळ तेथील डॉक्टरांवर आली. परंतु, संबंधित महिलेवर सिझेरियन (शस्त्रक्रिया) करताना रक्तस्राव अधिक झाल्याने तिला अखेरीस शीव येथील रुग्णालयात पाठवावे लागले. इतके सगळे करावे लागल्यानंतरही जे नको होते ते झालेच. महिलेसह तिच्या नवजात अर्भकाचा रुग्णालयातच मृत्यू झाला. पहिल्याच वेळी प्रसूतीदरम्यान जे तिच्यासोबत घडले ते फार वेदनादायी आहे. इतर कोणा महिलेवर पुन्हा अशी वेळ येऊ नये, यासाठी खबरदारी घेणे गरजेचे आहे. या दोघांच्या मृत्यूसाठी नेमके जबाबदार कोण, कोणाचा निष्काळजीपणा यास कारणीभूत आहे, या सर्व प्रश्नांची उत्तरे अद्याप प्रशासनाकडून मिळालेली नाहीत. अन्सारी कुटुंबीयांनी या प्रकाराबाबत संताप व्यक्त केल्यानंतर हे प्रकरण पोलिसांकडेही गेले. अनेकदा डॉक्टर रुग्णाला आवश्यक असणारी औषधे ही शासकीय रुग्णालयांमध्ये उपलब्ध नसल्याने रुग्णाच्या नातेवाइकांना बाहेरूनच विकत आणण्यास सांगतात. कटू असले तरी ते वास्तव आहे. २०२१ साली अग्निरोधक यंत्रणा नसल्यामुळे भंडारा जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील नवजात शिशू केअर युनिटमध्ये आग लागून जवळपास दहा नवजात बालकांचा मृत्यू झाल्याचीही घटना घडली होती. ही घटना घडल्यानंतर सर्व रुग्णालयांमध्ये फायर ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला. फायर ऑडिटसोबतच रुग्णालयांमधील अपुऱ्या सोयीसुविधांचेही लेखापरीक्षण (ऑडिट) होणे गरजेचे आहे. तरच रुग्णालयांमधील रुग्णांचे बळी रोखता येतील.

पान १ वरुन

### शासकीय यंत्रणेला पूर्व सूचना..

सद्यस्थितीत २७ कामे सुरू आहेत तर ७९ कामे सुरू झालेली नाहीत. जी कामे सुरू झाली नाहीत ती कामे आचारसंहिता संपल्यानंतर तात्काळ सुरू करावीत. तसेच मंजूर कामातून ६५ कामे रद्द करण्याची शिफारस संबंधित यंत्रणांनी केलेली आहे. ती कामे का रद्द करावीत याचा अहवाल कारणासह तात्काळ संबंधित यंत्रणांनी प्रशासनाला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

यावेळी जलयुक्त शिवार अभियान २.० चा ही आढावा घेऊन संबंधित यंत्रणांनी कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

प्रारंभी जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. दामा यांनी जिल्ह्यात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत २५२ कामामधून ८१ कामे पूर्ण झालेली आहेत. या ८१ कामापैकी ५२ कामे सन २०२३ मध्ये पूर्ण होऊन त्यातून २१.३३ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आलेला असून तो अंदाजे ६०० हेक्टर क्षेत्रावर टाकलेला आहे त्याचप्रमाणे सन २०२४ मध्ये २९ कामांमधून २०.६१ लक्ष घनमीटर काढून तो अंदाजे ५५० हेक्टर क्षेत्रावर पसरवलेला आहे यातून जवळपास १ हजार ६०० शेतकऱ्यांना लाभ झालेला असून एकूण ०.१४८ टीएमसी पाणी साठवण क्षमता निर्माण झालेली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. त्याचप्रमाणे सद्यस्थितीमध्ये २७ जलसाठ्यामधून गाळ काढण्याचे काम सुरू असून त्यातून आत्तापर्यंत ११.६१ लक्ष घनमीटर गाळ काढलेला आहे. जी ७९ कामे सुरू झालेले नाहीत त्यातील १५ कामे जलसंपदा विभाग ५१ कामे जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभाग व १३ कामे मृद व जलसंधारण विभागाची असल्याचेही त्यांनी सांगितले.

### घाटकोपर दुर्घटनेतील आरोपी ..

भावेश भिंडे विरोधात आतापर्यंत २३ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय त्याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हादेखील दाखल आहे. याचवर्षी २४ जानेवारी रोजी मुंलुंड पोलीस ठाण्यात भिंडेविरोधात बलात्कार आणि विनयभंगाची तक्रार दाखल करण्यात आली होती. मुंबई उच्च न्यायालयाने त्याला अंतरिम जामीन मंजूर केला होता. अवैधरित्या फलक लावल्यामुळे त्याला आतापर्यंत मुंबई मनपाने २१ वेळा दंड ठोठावला आहे. तसेच धनादेश बाऊन्स केल्याप्रकरणी दोन गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत.

# नंगपूरामुर्रीची निवासी शाळा साधते विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास...!

## विविधतेने कौशल्यपूर्ण विकास : विद्यार्थ्यांची प्रगणीसाठी कटिबद्ध

**मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :**

ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थी शाळेत जावे म्हणून राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अनुसूचित जातीच्या निवासी शाळा सुरू केल्या. नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांचा कौशल्य पूर्ण व्यक्तिमत्व विकास करण्याचा निर्धार करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सदर निवासी शाळा ही कटिबद्ध आहे. विविध उपक्रम राबवून विभागात शैक्षणिक दर्जा उंचावत असणारी ही शाळा आहे. ही शाळा सर्वांगीण विकास करण्यासाठी तत्पर आहे.

या शाळेत इयत्ता ६ ते १० वी पर्यंत वर्ग प्रवेश देऊन शिक्षण दिले जाते. सदर शाळेने पदार्पणातच १० वीचा १०० टक्के निकालाची परंपरा आजतागायत कायम ठेवली आहे. दिनांक २६ जून २०१२ ला ही शाळा सुरू झाली आहे. आजही पूर्व विदर्भातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**या शाळेची खास वैशिष्टे** नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र, डिजीटल अभ्यासक्रम शिक्षण, फक्त २०० मुलांना प्रवेश दिला जातो. पूर्व विदर्भातील जिल्ह्यातील मुलांचा प्रवेश आहे. दरवर्षी इन्सापायर अवार्ड, शिष्यवृत्ती परीक्षा, अशात भाग घेत असतात व उत्तीर्ण होतात. मुल्यशिक्षण पारिपाठ संवर्धन अंतर्गत विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व सर्वांगीन विकास व्हावा म्हणून विविधपैलू राबविले जातात. इंग्रजी भाषेत परिपाठ, संविधान प्रास्ताविक पठन, दररोज नवनवीन इंग्रजी शब्दार्थ मुखपाठ सादर करणे, दिनांकाप्रमाणे पाढे वाचन करतात. सुविचार, दिनविशेष सांगतात, संतवाणी, भारतीय संविधान कलम व त्यांची माहिती, व्याख्या सांगतात, म्हणी, सूत्र, आदी दररोज सुरू राहते. राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम, सामाजिक बांधिलकी मूल्य बालमनात रूजावे, यासाठी महामानवांच्या जयंती व स्मृतीदिन साजरे करून विद्यार्थी तयार करणे, भाषण, प्रश्र्नमंजूषा, क्रीडा अविष्कार घेण्यात येते.

**विविधांगी उपक्रमातून घडविण्याचे कार्य** टाकाऊपासून टिकावू वस्तू तयार करणे, हस्तकला, चित्रकला, वैज्ञानिक प्रयोग, प्रतिकृती, वैद्यकीय तपासणी, समूपदेशन कार्यक्रम, मोकळ्या ठिकाणी निसर्गाच्या सानिध्यात वनभोजन, वर्ग सजावट, रांगोळी स्पर्धा, वृक्ष लागवड, लगोरी, चमचागोळी, संगीत खुर्ची, हंडीफोड स्पर्धा, तीन पाय दौड स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा, कॅरम खेळणे, गीतगायन स्पर्धा, मुलाखत तंत्र, प्रश्र्नोत्तरांचा तास, प्रेरणा व प्रबोधन, चित्रपट, चिरत्रात्मक बोधपर भाषणे चित्रिफत दाखिवणे, संविधान सप्ताहात पथनाट्य, कलमे, परिशिष्ट, घटना निर्मिती प्रक्रिया, मुलभूत हक्क व अधिकार कर्तव्ये असे अनेक उपक्रम प्रत्येक आठवड्याला राबविले जातात. संविधान तासीका, रॅपीड संगणक टायपिंग घेवून विद्यार्थी घडत आहेत.

**कलाविष्कार, कौशल्य, प्रबोधन** विद्यार्थ्यांमधील सुप्तगुण बाहेर यावे, कलाकौशल्य, नृत्यांची, एकपात्री प्रयोग, एकांकिकात आवड असते परंतु ते बाहेर येऊन कलाकार कलावंत गायक वादक



घडावे म्हणून तबला हार्मोनियम गिटार अशा वाद्यांचे प्रशिक्षण देवून प्रबोधनपर भाष्य केले जाते.

**मोफत मुबलक सोयी सुविधांचा वापर** प्रत्येक विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक साहित्य, टेलिस्कोपने अवकाश पाहणे, यासह दूरचित्रवाणी कक्ष, ग्रंथालय कक्ष, संगणक कक्ष, इंटरनेट सुविधा, खेळाचे मैदान, खेळाचे सर्व साहित्य, सुंदर बाग, भोजनकक्ष, सभागृह, स्वतंत्र शौचालय, स्नानगृह, पंचतारांकित सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

**स्पर्धा परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना तयार करणे** विद्यार्थी हा प्रशासन व जनसेवा व स्पर्धा, कायदेविषयक मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यासाठी बाहेरील अधिकारी बोलावून कर्तृत्ववान सेवा करणारा अधिकारी बनावा, खेड्याचे विद्यार्थी जागृत व्हावे, म्हणून प्रशासनातील प्रथम श्रेणीतील अधिकारी बोलावून मार्गदर्शन व हितगूज साधतील अशी संधी देवून तयार केले जात आहे.

### ४ जून देशात डी-मोदीनेशन ..

लोक म्हणाले की उद्धव ठाकरे हे असं व्हायला नको होतं. भाजपाची जी संस्कारी पिढी होती त्याविषयी मला अजूनही आदर आहे. मोदी एकदा मला नकली सेना म्हणतात, दुसऱ्या दिवशी डोळा मारायचा परत मला नकली संतान म्हणायचं. आत्ताच्या भाजपाला सांगतोय की हे सरकार गजनी सरकार आहे. अशा सरकारला तुम्ही निवडून देणार आहात का? कारण हे उद्या तुम्हालाही विसरतील विचारतील तुम्ही या देशाचे मतदार आहात का? आम्हाला वाटलं की पाकिस्तानचे मतदार आहात, असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

देवेंद्र फडणवीस यांना आम्ही काय म्हणतो माहीत आहे. अक्षय कुमारला मी सांगणार आहे की मोदींची ४ जूनच्या आत परत एक मुलाखत त्याने घ्यावी आणि टरबूज कसं खातात मोदी ते विचारावं, पण हे ४ जूनच्या आत करावं. कारण ४ जून नंतर टरबुजाचा भाव उतरणार आहे. त्यांचं कसं चाललं आहे चपराशी झालो तरीही पुन्हा येईन. आपले मिंधे त्यांच्या मागे दाढी खाजवत फिरत आहेत. दाढी खाजवणारे बाळासाहेबांचे विचार पुढे नेणार, महाराष्ट्र तुमच्या डोळ्यांदेखत लुटला जातो आहे तरीही मिंधे दिल्लीची चाकरी करत आहेत. हे काय बाळासाहेबांचे विचार पुढे नेणार? आमच्या छत्रपती शिवरायांनी सूरत लुटली होती. त्या सूरतेचे दोघेजण महाराष्ट्र लुटत आहेत हे मिंधे पाहात आहेत. तरीही तुम्ही शांतपणे पाहताय हे बाळासाहेबांचे विचार? असा प्रश्र्न उद्धव ठाकरेंनी विचारला आहे.

### ४ जूनला नरेंद्र मोदींची ..

घेतला आहे. संपूर्ण देशातील वातावरण पाहता आम्ही असे म्हणू शकतो की इंडिया आघाडी ४ जून रोजी नवीन सरकार स्थापन करत आहे.

तसेच, २०२४ ची निवडणूक ही सर्वात महत्त्वाची निवडणूक आहे. लोकशाही आणि संविधान वाचवण्याची ही निवडणूक आहे. ही विचारधारेची निवडणूक आहे. एकीकडे गरिबांच्या बाजूने लढणारे पक्ष एकदिलाने लढत आहेत. दुसरीकडे, जे श्रीमंतांसोबत राहून अंधश्रद्धेसाठी लढत आहेत आणि लोक त्यांना योग्य वाटतात म्हणून धर्माच्या आधारावर लढत आहेत. असे म्हणत यांनी भाजपवर निशाणा साधला. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले, आमचा लढा गरिबांच्या बाजूने आहे. केंद्र सरकार ही पोकळी भरायला तयार नाही. इंडिया आघाडी बेरोजगारी आणि महागाईविरोधात लढत आहे. लोकशाही वाचवण्यासाठी आपण सर्वांनी काम केले पाहिजे, अन्यथा आपण गुलामगिरीत जाऊ.

### 'सीएए'नुसार पहिल्या १४ जणांना भारतीय नागरिकत्व

नवी दिल्ली नागरिकत्व दुरुस्ती कायद्याअंतर्गत (सीएए) बुधवारी १४ जणांना 'नागरिकत्व प्रमाणपत्रां'चा पहिलावहिला संच देण्यात आला. तीन शेजारी देशांतील छळ झालेल्या बिगरमुस्लीम स्थलांतरितांना वादग्रस्त ठरलेल्या सीएएतील तरतुदींनुसार भारतीय नागरिकत्व बहाल करण्यात आले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या दिवसाला ऐतिहासिक दिवस म्हणून संबोधले. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमध्ये धार्मिक छळ झालेल्या नागरिकांची दशकांची प्रतीक्षा संपली आहे, अशी प्रतिक्रियाही शहा यांनी व्यक्त केली. १४ जणांच्या अर्जांबाबतची ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर गृहसचिव अजय कुमार भल्ला यांनी १४ जणांकडे नागरिकत्व प्रमाणपत्रे सुपूर्द केली.

## शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामार्फत मतदानाचा टक्का वाढीसाठी जनजागृती

ठाणे : मतदान हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य असून मतदानाचा अधिकार हा प्रत्येक नागरिकांनी बजावावा. आपले मत अमूल्य असून मतदान करुन आपण आपली लोकशाही बळकट करा.. मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो.. अशी जनजागृती शहापूर मधील आदिवासी वाड्या, पाडया, वेगवेगळ्या गावांमध्ये जाऊन, आदिवासी मुलांमुलींचे शासकीय वसतीगृह, शासकीय/अनुदानित आश्रमशाळांमध्ये करण्यात आली.

१३५ शहापूर (अ.ज.) विधानसभा मतदार संघामध्ये आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदान टक्केवारी वाढविण्याकरीता व्यापक प्रमाणात जनजागृती करणेबाबतचे विविध उपक्रम आले. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय शहापूर तथा स्वीप नोडल अधिकारी श्री. आर. बी. हिवाळे यांनी, विविध मतदार जनजागृती उपक्रम राबवून मतदान करण्याबाबत आवाहन केले.

दिव्यांग व वृध्द मतदार, नवीन मतदार, विविध सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच सहा. निबंधक सहकारी संस्था मिरची गल्ली, हॉटेल संघटना शहापूर, शहापूर मार्केट, ता. शहापूर, वैद्यकीय व्यावसायिक, ज्वेलर्स असोसिएशन, ट्युशन क्लासेस व्हीजन अकॅडमी विश्र्वानंद संकुल पंडीत नाका या ठिकाणी मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली.


तसेच सावरोली, कोठारे, सुसरवाडी, दहागावं, पिवळी, टेंभा, शेणवा, डोळखांब, टाकीपठार येथील शासकीय आश्रमशाळा, जिल्हा परिषदेच्या विविध शाळा येथे पायी रॅली उपक्रम राबविण्यात आला असून मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच आईबाबांना पत्र, चर्चासत्र, यांसारखे महत्त्वाचे उपक्रम राबविण्यात आले.

तसेच नाभिक संघटना शहापूर, वकील संघटना आसनगाव रेल्वे स्टेशन, शहापूर बस स्थानक, आशीर्वाद हॉटेल चौक, स्मार्ट पॉईंट, बिकानेर स्वीट मार्ट, नर्सिंग कॉलेज इ. गर्दीच्या ठिकाणी मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. सापगांव, साखरोली येथील विटभट्टी कामगारांना मतदानाबाबतचे महत्त्व सांगून मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. मतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत तपासता यावे व त्यांचे मतदान केंद्राची माहिती व्हावी याकरीता मतदान चिठठ्या बीएलओ मार्फत वाटप करण्यात येतील व मतदानाचे महत्त्व सांगून जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच १७/०५/२०२४ व १८/०५/२०२४ रोजी शाळा व महाविद्यालयांमार्फत पालकांना मतदान करण्याबाबतचे आवाहन करणारे संदेश व्हॉटस ॲप द्वारे पालकांना पाठवून मतदानांबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, पेंढरघोळ येथे आदिवासी संस्कृतीचे आदर्श मतदान केंद्र बनविण्यात येत असून तेथे सेल्फी पॉईंटची स्थापना करणे, आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणा-या विविध वस्तूंची मांडणी करणे, वारली पेंटींग, आदिवासी बोलीभाषेत बॅनर बनविणे, आदिवासी वेशभुषा, आदिवासी पथनाटय बसविणे, मतदान करण्यासाठी येणा-या लोकांना पुष्प देऊन स्वागत करणे इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती एकात्मिक आदिवासी प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी श्री.आर.बी.हिवाळे यांनी दिली.

## मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदारसंघात १७३ ज्येष्ठ, दिव्यांग मतदारांनी बजावला गृहमतदानाचा हक्क : निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दादाराव दातकर

मुंबई उपनगर : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २८ - मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदारसंघात २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. मतदारसंघात एकूण १७३ मतदारांनी गृहमतदान केले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. दादाराव दातकर यांनी दिली आहे. १५६ विक्रोळी विधानसभा मतदारसंघात २८ ज्येष्ठ मतदार आणि तीन दिव्यांग मतदार होते. त्यापैकी एक व्यक्ती मृत झाल्याने ३० मतदारांनी मतदान केले आहे. निवडणुकीसाठी नियुक्त पथकाने घरोघरी जाऊन आस्थेने त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित केले असल्याचे १५६ - विक्रोळी विधानसभा मतदारसंघाच्या अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गीता गायकवाड यांनी सांगितले. मतदारांनी एका मतासाठी निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी घरी आल्याचे समाधान आणि मतदान करता आल्याचा आनंद व्यक्त केला असल्याचेही त्यांनी सांगितले. १६९ घाटकोपर पश्र्चिम विधानसभा मतदारसंघ, १५६ विक्रोळी, १७० - घाटकोपर पूर्व, १५७ - भांडूप पश्र्चिम, १७१ - मानखुर्द शिवाजीनगर, तसेच १५५- मुलूंड या विधानसभा मतदारसंघात समन्वय अधिकारी यांनी पथकासह मतदारांच्या घरी जाऊन गुप्तपणे गृहमतदानाची प्रक्रिया पार पाडली. उपजिल्हाधिकारी योगेश खरमाटे, समन्वय अधिकारी श्री. वानखेडे, तहसीलदार वृषाली पाटील, एस. ए. खानविलकर, तहसिलदार ज्योती वाघ, तहसीलदार सतीश कदम या अधिकाऱ्यांनी



आपल्या पथकासह गृहमतदानाची जबाबदारी पार पाडली.

**विक्रोळीमधील १०० वर्षीय काशिबाई कुपटे यांनी केले मतदान**

आजपर्यंत मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. आता प्रकृती खालावल्याने कुठेही जाऊ शकत नाही. यावेळी आपले मतदान वाया जाईल, असेच वाटत होते. मात्र, निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी घरी येऊन गुप्त पद्धतीने मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. मत वाया गेले नाही, मतदानाचा हक्क बजावता आला याचा आनंद काशिबाई कुपटे या १०० वर्षीय आजीबाई यांनी यावेळी व्यक्त केला. तरूणांनीही मतदान नक्की करावे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सोमनाथ राऊत यांना दिल्लीत नवरत्न पुरस्काराने सन्मानित



**ठाणे/मिलींद जाधव**

कल्याण तालुक्यातील दहिवली गावातील सोमनाथ राऊत ह्यांच्या कार्याची दखल दिल्ली येथील नवरत्न फाउंडेशनने घेऊन प्रोग्राम समर्पण २०२४ मध्ये त्यांना नवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यात पुरस्काराचे स्वरूप म्हणून अकरा हजार रुपयांची रोख रक्कम देण्यात आली आहे. सदर हा कार्यक्रम दिल्लीत नोएडा इंदिरा गांधी कला केंद्र येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी भारतातील ७ नागरिकांना सन्मानित करण्यात आले. युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून कल्याण तालुक्यात आदिवासी भागात सामाजिक ,शैक्षणिक ,सांस्कृतिक उपक्रम स्वखर्चातून राबवून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवत असतात. म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन.दिल्ली येथील नवरत्न फाउंडेशनच्या वतीने प्रोग्राम समर्पण २०२४ मध्ये नवरत्न फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक श्रीवास्तव यांच्या हस्ते युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ राऊत यांना नवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच स्तरातून युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ राऊत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# आषाढी वारीत भाविकांच्या सुविधांबाबत सुक्ष्म नियोजन करावे :अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर

**पंढरपूर/प्रतिनिधी:**

श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज तसेच अन्य संताच्या पालख्याबरोबर आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पंढरपूरात मोठ्या संख्येने वारकरी, भाविक येतात. यंदाची आषाढी यात्रा आरोग्य संपन्न पूर्ण व्हावी. तसेच निर्वघ्नरीत्या पार पडावी यासाठी प्रशासनातील सर्वच विभागांनी वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी– सुविधांबाबत दक्षता घेवून सुनियोजित आणि सूक्ष्म नियोजन करावे अशा सूचना अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी दिल्या. आषाढीवारी पुर्वनियोजनाबाबत सांस्कृतिक भवन, प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले, परिविक्षाधिन सहा.पोलीस अधिक्षक शुभम कुमार, तहसिलदार सचिन लंगुटे, सहा. गटविकास अधिकारी राजाराम भोंग, सां.बा. कार्यकारी अभियंता अमित निमकर, महावितरणचे कार्यकारी अभियंता विजय पाटील, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे श्री. घोडके, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक महेश सुडके, भीमा पाटबंधारे विभागाचे उप-कार्यकारी अभियंता जे.व्ही. इंगवले, उपमुख्याधिकारी सुनिल वाळूंजकर, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, व्यवस्थापक बालाजी पुदलवाढ यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



यावेळी अप्पर जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, आषाढी यात्रा सोहळा पावसाळ्याच्या कालावधीत पार पडत असल्याने यावेळी वादळ, वारे येण्याची शक्यता लक्षात घेवून वारकरी व भाविकांच्या सुरेक्षेसाठी पालखी मार्गावरील तसेच पंढरपूर शहरातील बेकायदा होर्डींग तात्काळ काढण्यात यावेत तसेच अधिकृत होर्डींगचे स्ट्रक्चरल ऑडीट करावे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी मार्गावरील रस्त्याची कामे तात्काळ पुर्ण करावीत. वारकरी भाविकांना पालखी तळांवर, मार्गावर भाविकांना पाणी मुबलक प्रमाणात मिळेल यादृष्टीने आवश्यक ते नियोजन करावे. पालखी तळांवर आवश्यक प्रमाणात मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी.

पंढरपूर शहरातील रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करावी. तसेच गटारी नाले यांची स्वच्छता करावी. धोकादायक इमारती धारकांना तात्काळ नोटीस द्यावी. मोफत पार्किंग बाबत ठळक अक्षरात बोर्ड लावावेत तसेच त्या ठिकाणी उपलब्ध सोयी–सुविधांची माहिती व ठिकाणे याबाबत फलक लावावेत. गर्दीच्या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात यावी. आरोग्य विभागाने वारीत येणाऱ्या भाविकांची संख्या तसेच पावसाळयात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्र्वभूमीवर मुबलक औषधसाठा उपलब्ध ठेवावा.

अन्न व औषध विभागाने पालखी मार्गावरील तसेच शहरातील खाद्यपर्थांच्या दुकानाची तपासणी करण्यासाठी पथके नेमावेत. तसेच पालखी मार्गावर सामाजिक स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून वारकरी भाविकांसाठी अन्नदान केले जाते त्याची तपासणी करावी. जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाने पालखी तळांवर मुरमीकरण करावे. वीज वितरण कंपनीने पालखी तळावर व मार्गावर वीज वाहक तारांचे अडथळे येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. अन्न विषबाधा होऊ नये यासाठी मठात, धर्मशाळेमध्ये कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबत जनजागृती करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी नगरपालिका, महसूल, पोलीस विभाग, महावितरण, रेल्वे, एसटी महामंडळ मंदिर समिती , पाणी पुरवठा तसेच संबधित विभांगानी आतापासूनच वारीचे नियोजन करावे. कालबद्ध रीतीने नियोजन पूर्ण करून वारीसाठी सज्ज राहण्याच्या सूचनाही अप्पर जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या.

# हैदराबाद येथील भाविकांकडून मंदिर समितीस ८.३६ लक्ष किमतीचे सोने भेटवस्तू अर्पण





**पंढरपूर/प्रतिनिधी:**

पंढरपूर दिनांक १६ श्रीमती विजया नायडू हैदराबाद या दानशूर भाविकाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर यांना १३० ग्रॅम वजनाची सोने भेट वस्तू अर्पण केले आहे त्याची किंमत आठ लक्ष ३६ हजार होत आहे

या दानशूर भाविकांच्या सत्कार मंजुरी समितीचे व्यवस्थापक श्री बालाजी पुदलवाड यांच्या शुभहस्ते उपरणे व दैनंदिनी देऊन येतोच सन्मान करण्यात आला

यावेळी श्रीमती नायडू यांच्या कुटुंबीयांच्या उपस्थित होते

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे राज्यातील अन्नदान सेवेतील उत्कृष्ट धार्मिक केंद्र : वसंतराव मुंडे




**अक्कलकोट/प्रतिनिधी :**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यास हे राज्यातील अन्नदान सेवेतील उत्कृष्ट धार्मिक केंद्र असल्याचे मनोगत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी व्यक्त केले. ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता मंडळाचे विश्र्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत अक्कलकोट तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे, सचिव विश्र्वनाथ चव्हाण, नंदकुमार जगदाळे, बसवराज बिराजदार, स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, दयानंद दणुरे, रमेश भंडारी, निंगप्पा निंबाळ समाधान अहिरे आदि पत्रकार बांधव उपस्थित होते.यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, कल्याण देशमुख, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, शावरेप्पा माणकोजी, शिवकुमार स्वामी, निखील पाटील, प्रविण घाडगे, विजय माने, चंद्रकांत हिबारे, काशिनाथ वाले, विश्र्वनाथ कलशेट्टी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# झाडे लावा झाडे जगवा निव्वळ कोरडे भाषण

## मंगरूळपीर नगर परिषदेचे झाड तोडे धोरण.

**मंगरुळपीर/प्रतिनिधी:**

वैशिष्ट्यपूर्ण निधी अंतर्गत मंगरूळपीर शहरात निर्माणधीन असलेल्या अकोला चौक ते संत बिरबलनाथ महाराज मंदिर या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे तसेच अंदाजपत्रकाला बाजूला सारून मनमर्जी ने काम करण्याचे धोरण सर्वश्रुत आहेच. नागरिकांच्या कुठल्याही तक्रारीवर कारवाई करणार नाही असे ठरवलेल्या प्रशासकीय यंत्रणेपासून फारश्या अपेक्षाही आता उरलेल्या दिसत नाही.

सदर रस्त्याच्या कामामध्ये शहरातील जुन्या व्हिडिओ चौक (जय महाराष्ट्र चौक) येथील काही झाड तोड्या वृत्तीच्या लोकांनी नगरपालिकेला निवेदन देत असे सांगितले की सदर चौकामध्ये भले मोठे कडुलिंबाचे झाड आहे व या झाडामुळे रहदारीला त्रास होत आहे त्यामुळे सदर झाड तोडून टाकण्यात यावे. आश्र्चर्याची बाब अशी आहे की याच शहरात दहा वर्षापेक्षा जास्त प्रदीर्घ काळापर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण चे खांब हे रस्त्याच्या मधात होते अनेक अपघात त्या खांबावर वाहन कोसळून झाले परंतु त्यामुळे कधीही वाहतुकीला अडथळा होत आहे अशा पद्धतीचे निवेदन देण्यात आले नाही. शहरातील मुख्य रस्त्यांमध्ये जड वाहने प्रतिबंधित केली तर फार मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरळीत होऊ शकते परंतु अशा आशयाचे सुद्धा एखादेही निवेदन देता आले नाही.

परंतु एका झाडापासून अशी काय अडचण आहे अशा आशयाचा सूर सुद्धा शेकडो नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळतो. शहरातील काही जागरूक नागरिकांनी व निसर्ग स्पर्श फाऊंडेशन या पर्यावरणवादी संस्थेने सदर झाड वाचवण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने प्रयत्न करावे असे आशयाचे पत्र मंगरूळपीर प्रशासनाला दिले. परंतु काही राजकीय लोकांच्या प्रभावामध्ये नगरपालिका प्रशासनाने झाड वाचवण्यासंदर्भातील निवेदनांचा फारसा विचार केला नाही व झाड तोडण्यासंदर्भातील निवेदनावर झाड तोडण्यासाठी प्रस्ताव तयार केला व टिपणी मंजुरी स्तव सादर केली.

पर्यावरण अभ्यासक गौरवकुमार इंगळे यांनी अनेक वेळा समाज कल्याण पर्यवेक्षक ढोंगळे यांना विचारले की झाड वाचवण्याच्या दृष्टीने आलेले निवेदन हे सदर प्रस्तावांमध्ये का विचारात घेतले नाही तर थातूरमातूर उत्तर देऊन ते नेहमीच टाळण्याचा प्रयत्न करत असतात. झाड तोड्या वृत्तीच्या लोकांनी दिलेला एकुलता एक कागदही हरवत नाही व झाड वाचवण्यासंदर्भात नगरपालिकेच्या फेऱ्या मारणाऱ्या पर्यावरणवादी लोकांना थातूरमातूर उत्तरे देऊन परत केल्या जाते.



मंगरूळपीर शहरात सतत गैरहजर असणारे मुख्याधिकारी सुद्धा झाड तोडण्याच्या टिप्पणीवर स्वाक्षरी करतात परंतु झाड वाचवण्यासाठी आलेल्या निवेदनांचा विचारही केल्या जात नाही.

सदर टिपणीवर मुख्याधिकारी यांनी सुद्धा स्वाक्षरी करून प्रशासक म्हणून सुद्धा स्वाक्षरी केली आहे. दिवसभर नगरपालिकेमध्ये बसून महिन्यातून दोन वेळेस नगरपालिकेत देणाऱ्या मुख्याधिकारी ला आपल्या बाजूने वळून घेणाऱ्या झाड तोड्या वृत्तीच्या लोकांचा कुठेतरी विजय होताना दिसत असल्याची खंत गौरव कुमार इंगळे यांनी व्यक्त केली. पूर्ण पगारी परंतु प्रभारी असलेल्या मुख्याधिकाऱ्यांनी आजवर कुठल्याही तक्रारीची दखल घेतल्याची दिसत नाही उलट पक्षी निकृष्ट दर्जाच्या विकास कामांमध्ये त्यांचे अप्रत्यक्षपणे सहकार्य असल्याचे अधोरेखित होत आहे.आज जगाला जलवायू परिवर्तन सारख्या समस्या भेडसावत आहेत.


जागतिक तापमान वाढ मुळे ऋतूंमध्ये बदल झालेला दिसत आहे. परंतु नगरपालिकेच्या झाड तोड्या धोरणांमध्ये कुठेही बदल झालेला दिसला नाही. एक कडुलिंबाचे झाड तोडल्याने काय होते अशा वृत्तीच्या झाड तोड्या लोकांनी आजवर शहरांमध्ये किती झाडे लावली हे सुद्धा संशोधनाचाच विषय आहे.

# भिवंडीत बाळ्या मामांच्या प्रचारासाठी महाविकास आघाडीच्या जाहीर सभेचे आयोजन

## शरद पवार,उद्धव ठाकरे, अरविंद केजरीवालांसह अनेक नेत्यांची लागणार हजेरी

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक प्रचार अंतिम टप्यात असतांना निवडणुकीचे वातावरण तापले आहे. अवघे दोन दिवस शिल्लक असल्याने महाविकास आघाडीच्या वतीने भिवंडीत जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या प्रचारासाठी अध्यक्ष शरद पवार शुक्रवारी भिवंडीतील चावींद्रा पोगाव येथील मोकळ्या मैदानावर सायंकाळी पाच वाजता भव्य सभा घेणार असून महाविकास आघाडीच्या या जाहीर सभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे,नेते खा. संजय राऊत,खा. अमोल कोल्हे,दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, काँग्रेसचे खा.इम्रान प्रतापगढी,काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, समाजवादीचे



प्रदेशाध्यक्ष अबू आसिम आझमी,शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील,आमदार जितेंद्र आव्हाड,आरपीआय सेक्युलरचे अध्यक्ष शामदादा गायकवाड, आमदार रईस शेख,भारत जोडो अभियानाच्या उल्का महाजन आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. या सभेसाठी भिवंडी लोकसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महाविकास आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी नागरिकांना केले आहे.

# प्रत्येकाने दासोह तत्व अंगीकारावा : नरेंद्र गंभीरे

**सोलापूर/प्रतिनिधी :**

आपण कमावलेल्या उत्पन्नातील काही अंशी वाटा समाजातील गरजू लोकांचा असतो. तो त्यांना द्यावा असे दासोह तत्व १२ व्या शतकात महात्मा बसवेश्र्वरांनी सांगितले. त्याचे पालन वीरशैव व्हिजन आज करत आहे. तो दासोह तत्व समाजातील प्रत्येकाने अंगीकारावा असे आवाहन श्री सिद्धेश्र्वर बँकेचे व्हाईस चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी केले. वीरशैव व्हिजन तर्फे १०० गरजूंना अन्नदान उपक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आस्था रोटी बँकेचे अध्यक्ष आनंद तालीकोटी, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समिती अध्यक्ष शिवानंद सावळगी, सोमनाथ चौगुले, अविनाश हत्तरकी, सिद्धेश्र्वर कोरे उपस्थित होते. यावेळी आस्था रोटी बँकेच्या सहकार्यातून १०० गरीब, गरजू व्यक्तींना बालुशाही, चपाती, आमटी आणि मसाला भात असे अन्नदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुहास छंचुरे, सिद्धु बेऊर, वेदांत तालीकोटी, महेश नागणसुरे, प्रशांत कस्तुरे, माधव जाधव यांनी परिश्रम घेतले.



## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने केलेली व्यवस्था ही भाविकांची काळजी घेणारे : प्रभाकर जाधव

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून केलेली व्यवस्था ही भाविकांची काळजी घेणारे असल्याचे मनोगत पुणे जिल्हा न्यायाधीश प्रभाकर जाधव यांनी व्यक्त केले.ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता मंडळाचे सचिव शामराव मोरे यांच्या उपस्थितीत विश्र्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी सोलापूरचे ॲड. व्ही. एन. देशपांडे व न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, कल्याण देशमुख, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, शावरेप्पा माणकोजी, शिवकुमार स्वामी, निखील पाटील, प्रविण घाडगे, विजय माने, चंद्रकांत हिबारे, काशिनाथ वाले, विश्र्वनाथ कलशेट्टी, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# पोलीस विभागाने तपासासाठी प्रलंबित असलेली प्रकरणे त्वरित निकाली काढावीत :जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**सोलापूर/प्रतिनिधी:**

अनुसूचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ व संशोधित अधिनियम २०१५ अन्वये जिल्ह्यात पोलीस विभागाकडे ४७ प्रकरणे तपासासाठी प्रलंबित आहेत. यामध्ये सोलापूर शहर पोलीस यांच्याकडे १० तर ग्रामीण पोलीस यांच्याकडे ३७ प्रकरणे तपासासाठी प्रलंबित आहेत. तरी उपरोक्त सर्व प्रकरणे पोलीस विभागाने त्वरित निकाली काढावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले, पोलीस उपाधीक्षक गृह विजया कुर्री, पोलीस शहर उपायुक्त प्रांजली सोनवणे, जिल्हा सरकारी अभियोक्ता डी एम पवार, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार,



सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद आदटराव यांच्यासह उपरोक्त समितीचे अन्य सदस्य ही उपस्थित होते.जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की पोलीस तपासावरील प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे निकाली काढावीत जेणेकरून संबंधित पीडितांना शासकीय अर्थसहाय्य समितीला देणे शक्य होईल. ग्रामीण पोलिसांकडे प्रलंबित प्रकरणे अधिक असल्याने जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी त्यांच्या स्तरावर प्रलंबित प्रकरणाचा आढावा घेऊन सदरचा अहवाल समितीला सादर करावा. तसेच संबंधितांना न्याय मिळणे गरजेचे असून सरकारी अभियोक्ता येणे न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणात पाठपुरावा करून ती प्रकरणे निकाली काढावीत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ व संशोधित अधिनियम २०१५ ची सविस्तर माहिती व ज्ञान संबंधित नागरिकांना व्हावे यासाठी समाज कल्याण विभागाने तालुकास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करावे. यासाठी या अधिनियमांची सविस्तर ज्ञान असलेल्या स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. प्रत्येक तालुक्यात कार्यशाळा घेण्यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून समाज कल्याण विभागाला उपलब्ध करून दिला जाईल. या कार्यशाळा दिनांक १५ ते २० जून २०२४ या कालावधीत आयोजित कराव्यात असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

***ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती** : ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कक्ष स्थापन करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, महापालिका आयुक्त, उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व मुख्याधिकारी, सर्व गटविकास अधिकारी यांना कळविण्यात आलेले होते त्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी सर्व संबंधित यंत्रणांकडून विरंगुळा कक्ष स्थापन केल्याची माहिती घ्यावी व पुढील आठ दिवसात सादर करावी. ज्या शासकीय यंत्रणांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा कक्ष स्थापन केला नाही त्यांनी सदरचा कक्ष त्वरित सुरू करण्याबाबतची कार्यवाही करावी. सोलापूर महापालिकेने चार ठिकाणी विरंगुळा कक्ष स्थापन केलेला आहे, त्या कक्षाची तपासणी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी करावी व या कक्षात ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेला आहेत व त्या उत्कृष्ट आहेत याबाबतची खात्री करून तसा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

प्रारंभी सहायक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत जिल्हास्तरावरील समितीच्या कामकाजाची माहिती सादर केली. यामध्ये पोलीस विभाग यांच्याकडे तपासावर प्रलंबित असलेली प्रकरणे, न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे व अर्थसहाय्यासाठी मंजूर प्रकरणे तसेच ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती अंतर्गत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त आदीची सविस्तर माहिती बैठकीत सादर केली.

# नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे आदिवासी विकास विभाग आयुक्त श्रीमती .भा.प्र.से.नयना गुंडे यांना निवेदन

**निफाड/प्रतिनिधी**

टाकेद बुद्रुक येथील अनुदानित आश्रम शाळेतील १२ वर्ष मुख्याध्यापक पदावर सेवारत असलेल्या मुख्याध्यापकांवर संस्थेने अचानक मनमानी पद्धतीने व एकतर्फी कारवाई करत पदावनत केलेले आहे. संस्थेने शिक्षकांच्या खोट्या तक्रारी घेऊन मुख्याध्यापकांना वेळोवेळी मेमो दिलेले आहेत. सदर मेमोंचे मुख्याध्यापक यांनी समर्पक खुलासा करूनही संस्थेच्या सचिवांनी संस्थेत सेवारत महिला स्त्री अधिक्षिका, शिक्षक व कर्मचारी यांच्या खोट्या तक्रारी घेत मुख्याध्यापक यांच्यावर खालच्या पदावर आणण्याची कारवाई केलेली आहे, सदर मुख्याध्यापकांविषयी १२ वर्षात कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नसतांना किंवा संस्थेने मेमो दिलेले नसतांना, संस्थेने आणि कर्मचाऱ्यांनी प्रशासन व शिस्त याला विरोध करत वैयक्तिक आकसापोटी तक्रारी केल्याचे दिसून येते. संस्थेने आपल्या मर्जीतील मुख्याध्यापक यांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देण्याकरिता अशा आशयाचे खोटेनाटे आरोप केलेले दिसून येते. सेवाजेष्ठतेने कनिष्ठ असलेल्या आपल्या नात्यातील शिक्षकाला मुख्याध्यापक पदावर बसविण्याकरिता



शिक्षक व कर्मचारी एकाच वेळी अशा तक्रारी करणे, संस्थेने विद्यार्थी अनुदान खाते स्वतःकडे ठेवणे, सहलीला स्वतः जाणे, शासन आदेशाना न जुमानणे, आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना सवलती देणे, प्रामाणिक व चांगले काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दहशत निर्माण करणे, असे प्रचंड अंदाधुंदी चे प्रकार या संस्थेमध्ये संस्थेचे सचिव करत आहेत. या संस्थेच्या आश्रम शाळेतील मुख्याध्यापकांवर अन्याय झाल्यामुळे ही तक्रार मुख्याध्यापक संघाकडे आलेली आहे. म्हणून अशा प्रकारांनी मुख्याध्यापक संघ आक्रमक झालेला आहे. यापूर्वीही मुख्याध्यापक संघाने अप्पर आयुक्त यांना निवेदन दिलेले आहे, परंतु त्याचे पुढे काय झाले हे अजूनही कळायला मार्ग नाही. म्हणून काल मुख्याध्यापक संघाचे सचिव एस बी देशमुख यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांसह श्रीमती नयना गुंडे आयुक्त आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य नाशिक यांची भेट घेऊन त्यांच्याशी याबाबत सविस्तर चर्चा केलेली आहे त्याचबरोबर आयुक्त यांना निवेदन देऊन ठणकावून सांगितले की सदर मुख्याध्यापकावरील अन्याय ३१ में पर्यंत दूर झाला नाही तर त्यांना न्याय देण्याकरिता मुख्याध्यापक संघ १ जून पासून आंदोलन करणार आहे ,यावेळी मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी एस. आर. निकम, बी. बी.निकम, एल. के. निकम, आर. बी. निकम, एस. आर. महाले, रमेश मानकर, .बी. बी. कापडणीस, एम. डी. काळे उपस्थित होते.*

## भिवंडीत बाळ्या मामा यांच्या प्रचारासाठी निघालेल्या बाईक रॅलीत हजारो नागरिकांचा सहभाग



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा मतदार संघात महाविकास आघाडी व राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या निवडणूक प्रचारासाठी गुरुवारी सायंकाळी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या बाईक रॅलीमध्ये हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवला. सायंकाळी पाच वाजता दिवानशहा दर्गाह येथून निघालेली बाईक रॅली बाबू चुन्नी बिल्डींग येथून मोहम्मद आली खान व नगरसेवक इरफान साहेब यांचे घराजवळून गोल्डन हॉटेल भंडारी चौक, नारपोली चौक,विठ्ठल नगर ,रतन टॉकीज ,धामणकर नाका, ठाणे रोड,मीना बाजार,कुंभार आळी,बंगालपूरा,जैतूनपुरा स्लैब, एकता हॉटेल,आग्रा रोड,धर्मवीर आनंद दिघे चौक,कॉटर गेट,निजामपूर,वंजारपट्टी नाका, मिल्लतनगर, बारक्या कंपाउंड,म्हाडा कॉलनी,संगम पाडा, छत्रपती शिवाजी महाराज चौक,कासार आळी, टिळक चौक,मदरछिल्ला येथून दर्गाह रोड येथे रॅलीचा समारोप होणार आहे.

महाविकास आघाडीला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असून या रॅलीत नागरिकांनी उत्स्फूर्द प्रतिसाद दिला आहे,त्यामुळे आपला विजय पक्का आहे अशी प्रतिक्रिया यावेळी सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी दिली आहे.

# लोरी... हिंदी चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर पाच दिवसात.. साडेचार कोटीची कमाई....!

पंढरपूर/प्रतिनिधीः अल्ताफ दादासाहेब शेख यांचे संगीत दिग्दर्शन असलेला 'लोरी हा हिंदी चित्रपट महाराष्ट्र राज्य आणि संपूर्ण भारतात आपल्या जवळचे चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे.

लोरी हिंदी चित्रपट सर्वत्र सिने रसिक प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. या लोरी हिंदी चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर पाच दिवसांपर्यंत साडेचार कोटीचा गल्ला जमा केला आहे. या चित्रपटाने सिनेमागृहात पुन्हा जोर धरला आहे उर्मिला धनगरी यांनी गायलेल्या हुका बड़ा नशीला... आणि ममता की मूरत... या सुरेश वाडकर यांनी गायलेल्या गाणी प्रेक्षकांच्या चांगलीचं पसंतीस उतरली आहेत. अल्ताफ दादासाहेब शेख यांचे संगीत दिग्दर्शन असलेल्या लोरी हिंदी चित्रपट संगीत दिग्दर्शनासोबत अल्ताफ शेख यांनी या चित्रपटाची गीत लिहिलेले आहेत.

अल्ताफ दादासाहेब शेख यांचा २०१८ ला वेडा बी एफ रिलीज झालेला या चित्रपटातील बॉलीवूड सिंगर अल्ताफ राजा यांनी गायलेली हे माझे दुर्वेश बाबा कव्वाली ही वर्ल्ड रेकॉर्ड झाली होती. आणि बॉक्स ऑफिस कलेक्शन हे अकरा करोड च्या पुढे झालं होतं.

या चित्रपटाचे यश पाहून अविनाश कवठणकर आणि राजू रेवणकर यांनी अल्ताफ दादासाहेब शेख यांना संगीत दिग्दर्शनाने गीत लेखनाची कामगिरी सोपवली होती.साईराम अ क्रिएटिव्ह वर्ल्ड'ची प्रस्तुती असलेल्या लोरी चित्रपटाच्या पुणे येथील मिराज सिनेमागृह येथील शो ला चित्रपटाचे निर्माते अविनाश कवठणकर, दिग्दर्शक राजू रेवणकर, संगीत दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख, सुधीर कुमार हजेरी,

सुप्रसिद्ध सिंगर सुरेश वाडकर स्वप्निल बांदोडकर उर्मिला धनगर प्रियंका बर्वे आणि अंजली गायकवाड या दिग्गजानी लोरी चित्रपटाची गाणी गायले आहेत.

डीओपी कुमार डोंगरे, पणती पटेल, राजकुमार, अली शेख, शान कक्कर, रंजीत दास, अभिलाषा घैरा, प्रतिभा शिंपी, आरती शिंदे; तर आर्ट - राजू माळी, मेकअप- केतन, कॉस्ट्यूम-



संगीता चौरे आणि आरती पाटील , लाईन प्रोड्यूसर- शाहजहां शेख, प्रोडक्शन मैनेजर- अमजदखान शेख, किरण घोडके, अभिषेक चौरे, हर्ष राजे, मेकअप - किरण सिद्दीद्दी प्रेक्षकांसह अल्ताफ शेख या चित्रपटातली गाणी संगीत आणि कथा प्रेक्षकांना खेळवून ठेवण्यासारखे आहे. अभिनेत्री जागृती जाधव आणि खोपोली महानगरपालिकेचे अधिकारी जाधव सर तसेच स्टार इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष हिमांशू (आप्पा वाघमारे )यांनी अल्ताफ शेख यांना शुभेच्छा दिल्या.

# 'मेघदूत' पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन

**बार्शी/प्रतिनिधी:**

येथील कवी कालिदास मंडळाच्यावतीने कालिदास महोत्सवाचे औचित्य साधून कवीच्या पहिल्या संग्रहास 'मेघदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. या मेघदूत पुरस्कारासाठी काव्यसंग्रह पाठविण्याचे आवाहन कवी कालिदास मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र इकारे यांनी केले आहे.गेली ३१ वर्ष कवी कालिदास मंडळ साहित्याच्या क्षेत्रामध्ये कार्य करीत आहे.नवोदित कवींना प्रोत्साहन मिळावे या हेतूने मंडळाच्या वतीने दरवर्षी नवोदित कवीच्या पहिल्या काव्यसंग्रहास मेघदूत पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. त्यानुसार जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रहास या वर्षी जुलै मध्ये संपन्न होणाऱ्या कालिदास महोत्सवामध्ये 'मेघदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्राप्त झालेल्या संग्रहातून दोन संग्रहांची निवड या पुरस्कारासाठी केली जाणार आहे.हे मेघदूत पुरस्कार साहित्यिक पं. ना. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ कवी मुकुंदराज कुलकर्णी यांच्यावतीने व ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश गव्हाणे यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून कवींनी दिनांक २० जून २०२४ पर्यंत काव्यसंग्रहाच्या तीन प्रती स्वतःचे छायाचित्र व अल्पपरिचय यासह प्रकाश गव्हाणे, ईश्र्वरी अभ्यासिका, पाटील प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी ता. बार्शी जिल्हा सोलापूर पिन ४१३४११ ( मो. ९७६३ ४६६८३०) येथे पाठवाव्यात यावेळी दत्ता गोसावी, प्रा अशोक वाघमारे, सुमन चंद्रशेखर, डॉ कृष्णा मस्तुद, जयसिंग राजपूत, चन्नबसवेश्र्वर ढवण, आबासाहेब घावटे, डॉ रविराज फुरडे,शिवानंद चंद्रशेखर,गंगाधर अहिरे आदी उपस्थित होते.

# उत्कर्ष फाउंडेशनमार्फत मोफत पाण्याच्या टॅंकरची सोय

सांगोला/प्रतिनिधीः तालुक्यातील शहर व ग्रामीण भागात दिवसेंदिवस पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्याने व शासकीय टॅंकरच्या मंजुरीला विलंब लागत असल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे दृश्य पाहून मुंबई येथील उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशनने कोणताही मोबदला न घेता तीन टॅंकर सोनलवाडी, बागलवाडी भागात पाठवून नागरिकांची तहान भागवण्याचे काम केले आहे. तालुक्यात भीषण दुष्काळी परिस्थिती असून नागरिकांचा व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामपंचायतीतर्फे टॅंकर मागणीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवून दिले तर पंधरा-पंधरा दिवस त्यास मंजुरी मिळत नाही. तोपर्यंत तहानलेल्या नागरिकांना रानोमाळ भटकंती करावी लागत आहे.

दरम्यान, मुंबईतील उत्कर्ष फाउंडेशनने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने तीन पाण्याच्या टॅंकरद्वारे व जनावरांना बारा हजार लीटरपेक्षा जास्त पाणी दररोज खिलारवाडी, बागलवाडी परिसरात वाटप केले जात आहे. एखाद्या भागात पाण्याची टंचाई निर्माण झाल्याची माहिती मिळताच त्याठिकाणी हे टॅंकर त्वरित जात आहेत. पिण्याच्या पाण्याची सोय होत असल्याने त्यांच्या उपक्रमाबद्दल नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे.